एमजेसी क्र. १५७/२०२२.
कडु शालीग्राम गुळदे +३ -वि.- कोणी नाही.
सीएनआर क्र. एमएचबीयु-०७-००१५१२-२०२२

MHBU070015122022

आदेश निशाणी क्रमांक ०१ खाली
[दिनांक-१२.१२.२०२२.]

१] प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी त्यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्याकरिता मुंबई नियमन कायदा १८२७ च्या कलम २ अंतर्गत दाखल केला आहे.

२] अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, मृत शालीग्राम बापुना गुळदे हे कायमचे शिरसगाव निळे, ता. शेगाव, जि. बुलडाणा येथील रहिवासी होते. त्यांचे दिनांक २८.०९.२०१५ रोजी शिरसगांव निळे, ता. शेगांव, जि. बुलडाणा येथे निधन झाले. मयताची पत्नी नामे गीता शालीग्राम गुळदे ह्या दि. २७.१०.२०२१ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयतांची मुले व अर्जदार क्र. ३ व ४ हया मयतांच्या मुली आहेत. अर्जदार वगळता इतर कोणीही मृत शालीग्राम बापुना गुळदे व मृत गीता शालीग्राम गुळदे यांचे कायदेशिर वारस नाहीत. त्यानुसार, अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली.

३] अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी निशाणी क्र. ८ नुसार जाहिरनामा प्रसिध्द केला. सदर, जाहिरनाम्याची प्रत मयताचे घर, ग्रा. पं. कार्यालय, शिरसगांव निळे, ता. शेगांव आणि न्यायालयाच्या नोटिस बोर्डावर लावण्यात आली. तसेच, अर्जदारांनी दि.०८.१०.२०२२ रोजीच्या "सांज दैनिक प्रश्नकाल" या वृतपत्रात जाहीर नोटिस प्रकाशित केली. त्याबाबत अर्जदारांनी वृत्तपत्राची प्रत जाहिर नोटिस बिलासह निशाणी क्र.१५ व १६ वर दाखल केली आहे. परंतु, अद्यापपावेतो या न्यायालयास अर्जदारांच्या अर्जावर आक्षेप प्राप्त झाला नाही. अर्जदाराने मृत शालीग्राम बापुना गुळदे व मृत गीता शालीग्राम गुळदे यांचे मुत्यू प्रमाणपत्र नि.क्र.१२ व नि.क्र. १३ तसेच सरपंच, ग्रा.पं. शिरसगांव निळे यांनी दिलेला वारसाचे दाखले नि.क्र.१४ वर दाखल केला आहे. तसेच अर्जदारांनी त्यांच्या आधारकार्डाची प्रमाणीत प्रती दस्त यादी क्र. ४ प्रमाणे दाखल केल्या आहेत. अर्जदार क्र. १ कडु शालीग्राम गुळदे यांनी आपला पुरावा प्रतिज्ञालेख निशाणी क्र.११ वर दाखल केला. अर्जदाराचा पुरावा अपरिवर्तित राहिला आहे. अभिलेखावरील पुराव्यांवरून असे दिसून येते की, अर्जदार हे मृत शालीग्राम बापुना गुळदे व मृत गीता शालीग्राम गुळदे यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब, अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणताही अडथळा येत नाही. म्हणूनच, मी पुढील

आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१] अर्ज मंजुर करण्यात येतो.

२] अर्जदारांना मृत शालीग्राम बापुना गुळदे व मृत गीता शालीग्राम गुळदे यांचे कायदेशिर वारस म्हणून घोषित करण्यात येते.

३] अर्जदारांनी विहित मुद्रांक शुल्क जमा केल्यानंतर अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४] सदर वारस प्रमाणपत्र हे मृताच्या मालमत्तेमध्ये कोणतेही अधिकार आणि मृत व्यक्तीच्या नावे असलेली रक्कम काढण्याचा अधिकार देत नाही.

स्वा/-

शेगाव: [जे.आर. घाडगे]

दि.१२.१२.२०२२. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
शेगाव.

मी के. एस. देशमुख, लघुलेखक (दिवाणी न्यायालय, कनिष्ठ–स्तर, शेगाव, ता.शेगाव, जि. बुलडाणा.) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ.ची सामग्री ही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.